# ज्येष्ठांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील

## सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले



पुणे, दि. १ (प्रतिनिधी) - शासनाने जाहीर केलेल्या ज्येष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित सर्व विभागांना देण्यात आली आहे. ज्येष्ठांच्या समस्या सोडविण्यासाठी मागील काळात ज्या गोष्टी झाल्या नाहीत, त्या करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत, असे मत सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, आमदार प्रा. मेधा कुलकर्णी आणि 'अ‍ॅस्कॉप'तर्फे ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'ज्येष्ठोत्सव' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'कार्यांजली' या आरोग्य शिबिराचे उद्घाटन बडोले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमात बडोले बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी उपस्थित होते. ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, ज्येष्ठ अभिनेत्री दीपा लागू, प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, कवयित्री अरुणा ढेरे, प्रतिभा शाहू मोडक, चैतन्य हास्ययोग क्लबचे मकरंद टिल्लू, ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक माधव वझे, ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस, मीडिया अ‍ॅनलिस्ट अभिनंदन थोरात, नोंदणी मुद्रक शुल्क विभागाचे माजी उपमहानिरीक्षक वसंतराव म्हस्के, कथक नृत्यकलाकार मनीषा साठे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बापू घाटपांडे, अशोक नाफडे, प्रसारमाध्यमतज्ज्ञ विश्वास मेहेंदळे, कवी गझलकार म. भ. चव्हाण, ज्येष्ठ लेखक शां. ग. महाजन आदींना 'पुण्याचे अभिमान पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

बडोले म्हणाले, प्रत्येक विभागाने ज्येष्ठांसाठी हेल्पलाइन सुविधा, गृह विभागातर्फे सुरक्षिततेसाठी 'प्रतिसाद' अ‍ॅप सुरू करावे, 'बार्टी'मार्फत प्रत्येक पोलीस ठाण्यात समुपदेशक नेमण्याची सूचना करण्यात आली आहे. कुटुंबातील आणि समाजातील ज्येष्ठ नागरिकांसोबत कसे वागावे, या संदर्भात पाठ्यपुस्तकात समावेश करावा, अशी सूचनाही विभागाला देण्यात आली आहे. या संदर्भात मुख्यमंत्रीही आढावा घेत आहेत. पुण्यासारख्या शहरात मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक राहतात. त्यांच्या सर्व समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठांमधला दुवा जुळला जावा, यासाठी ज्येष्ठांना चित्रबद्ध करून ठेवण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्यानुसार आत्तापर्यंत १३४ ज्येष्ठांचा संपूर्ण चरित्रपट तयार केले आहेत, असे ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ यांनी सांगितले.

कांबळे, सोनाली कुलकर्णी, डॉ. आगाशे, दीपा लागू, माधव वझे, थोरात आदींचीही भाषणे झाली. इतर ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.